अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः हरिश्चंद्र लक्ष्मण तेलंगे,

वयः ४७ वर्षे, व्यवसायः शेती,

राहणारः वांगणी, ता. रोहा.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत सुरु.**

०१. अंदाजे दोन वर्षांपूर्वी पोलीसांनी मला वाकण बारसई रोडवर पंचनामा करण्याकरीता पंच म्हणून बोलाविले होते. तेथे सनिल भिसे नावाचा मुलगा व मोरे हवालदार हजर होते. तेथे वाकण रोडवरून बारसईकडे येताना रस्त्याच्या डाव्या बाजूला मोटार सायकल नोंदणी क्र. एम एच ०६–बीवाय–९१४२ उभी होती. सनिल भिसे याने मला घटनास्थळ दाखवले. पोलीसांनी तेथे माझे समक्ष पंचनामा केला. त्यावर त्यांनी माझी सही घेतली. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.बी.सावंत यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, वाकण–बारसई रोडवर आंबोशी गावाजवळ कारखाना आहे, सदर रस्त्यावर अवजड वाहनांची वर्दळ असते, सदर रस्त्यावर स्ट्रीट लाईटची व्यवस्था नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्त्याचे दोन्ही बाजूला ५–६ फुटाच्या साईडपट्ट्या आहेत.

०३. हे म्हणणे खरे आहे की, अपघातस्थळ पक्क्या डांबरी रोडवर आहे.

साक्षीदार पुन्हा सांगातो की, घटनास्थळ रोडचे साईडपट्टीवर देखील आहे. मला मराठी वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा नि.क्र.१५ मधील मजकूर घटनास्थळ उत्तरेस ०२ फुट अंतरावर पक्क्या रोडवर असल्याचे दर्शविते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ रोडचे साईडपट्टीवर देखील असल्याबाबत खोटे सांगितले.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी मोक्यावर गेलो नव्हतो, पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला नव्हता, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.08.06 16:24:04 +0530

स्थळ रोहा,
दि.०६.०८.२०२२

(एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः देवीदास पांडुरंग तेलंगे,

वयः ४४ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः वांगणी, ता. रोहा.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत सुरु.**

०१. मी एस.टी.महामंडळामध्ये जामवाडी वर्कशॉपमध्ये नोकरीस आहे. माझी कामाची वेळ सकाळी ०८.३० ते संध्याकाळी ०५.०० अशी आहे. दि.०१.०७.२०१९ रोजी मी वाकणहून माझे गावी माझ्या मोटारसायकलने येत होतो. त्यावेळी वाकण–बारसई रोडवरील फणसाचा माळ येथे सनिल आणि पंकज दळवी रस्त्यावर उभे असल्याचे मला दिसले. त्या ठिकाणी आमचे गावातील इसम अनंत जाधव खाली पडलेले मला दिसले. त्यांचे डोक्याला मार लागलेला होता. त्यांचे डोक्यातून रक्त निघत हाते. तेथे बाजूला मोटार सायकल नोंदणी क्र. एम एच ०६–९१४२ होती. सनिल व पंकज यांचे बाजूला आरोपी उभा होता. मी सनिल व पंकज यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांनी आरोपीचे गाडीने अनंत जाधवला ठोकर दिल्याचे मला सांगितले. अनंत जाधव बेशुद्ध अवस्थेत पडलेले होते. मी सनिल व पंकज यांना अनंत जाधव यांना दवाखान्यात घेवून जाण्याचे सांगून मी त्या संबंधी त्यांचे घरी माहिती देत असल्याचे सांगितले. मी अनंत जाधव यांचे घरच्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगितले. काही वेळाने मी अनंत जाधव यांचे भाऊ संतोष जाधव यांचेसह परत घटनास्थळावर आलो असता सनिल व पंकज यांनी अनंत जााधवला तेथून नेल्याचे आम्हाला दिसले. अनंत जाधव यांचेवर डॉ.कोकणे यांचे दाखान्यात प्राथमिक उपचार करण्यात आले व पुढील उपचार

एम.जी.एम.हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यात आले.

०२. सदर घटनेच्या अनुशंगाने पोलीसांनी माझी विचारपूस केली होती व माझे बयाण नोंदविले होते. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.बी.सावंत यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघाताची घटना प्रत्यक्ष बघितली नाही, जुलै महिन्यामध्ये रोहा शहरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो, त्यावेळी दिवसभर ढगाळलेले वातावरण असते.

०४. अपघाताचे अनुशंगाने १५ दिवसानंतर पोलीसांनी मला विचारपूस केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पंकज व सनिल यांनी आरोपीचे मोटारसायकलीने अनंत जाधव यांना ठोकर दिल्याचे मला सांगितले नव्हते, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर लिखित

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.08.06 16:24:18 +0530

स्थळ रोहा, (एस. एस. महाले)
दि.०६.०८.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.